




मौजे खिळद ता. आष्टी जि. बीड येथील येडेश्वरी देवि नवरात्र उत्सवानिमीत्त “ओवी ज्ञानेशाची मंडळाच्या” वतीने आयोजीत

# राज्यस्तरीय ओवी ज्ञानेशाची” स्पर्धा परिक्षा २०२३

“ओवी ज्ञानेशाची” ही ज्ञानेश्वरी ग्रंथातील वैज्ञानिक ओव्यांवर आधारीत स्पर्धा परिक्षा २०२०, २०२१, २०२२ मध्ये “ओवी ज्ञानेशाची मंडळाच्या” वतीने आयोजित करण्यात आली होती. याही वर्षी ह.भ.प. गुरूवर्य श्री. सुदर्शन महाराज, यांच्या प्रेरणेतुन आणि मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरी ग्रंथावर आधारीत ओवी ज्ञानेशाची स्पर्धा परिक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. ज्ञानेश्वरी आजही मानवी जीवनासाठी उपयुक्त आहे. ज्ञानेश्वरीतील ज्ञान म्हातारपणी समजुन उपयोग नाही कारण ज्ञानेश्वरी हा जीवनाची सुरूवात करतांना, जीवन जगतांना अभ्यासण्याचा ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरीचा अभ्यास सर्वांगाने व्हावा. विशेषकरून तरूणांनी ज्ञानेश्वरी अभ्यासावी यासाठी ही स्पर्धा आयोजीत करण्यात येते. तरी आपण सर्वांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे ही आयोजकांची नम्र विनंती आहे. { स्पर्धेचा कालावधी दिनांक २४ ऑक्टोबर २०२३ पासुन ते दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ पर्यंत.}

## स्पर्धेच्या नियम व अटी

१. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयाची अट नाही.

२. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जात, धर्म, पंथ, लिंग, अथवा अन्य कोणतेही बंधन नाही. सर्वजण सहभागी होउ शकतात.

३. या स्पर्धेत तरूण, विदयार्थ्यी, वारकरी, वाचक, श्रोते, साधक, टाळकरी, माळकरी, अभ्यासक, किर्तनकार, प्रवचनकार, कथाकार असे सर्वजण सहभागी होउ शकतात. थोडक्यात या स्पर्धेत कोणीही सहभागी होवू शकतात.

## ओवी विश्लेषणाचा विषय व ओवी विश्लेषणाचे स्वरूप.

४. स्पर्धेकाने संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथामधील कोणत्याही तीन ओव्या निवडायच्या आहेत, की ज्यामध्ये वैज्ञानिक विचार, कल्पना, शोध, दृष्टांतरूपात मांडलेला आहे, अशा ओव्या निवडायच्या आहेत. वैज्ञानिक स्वरूपाच्या ओव्या, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, भुगोल, पर्यावरण, जीवशास्व, आरोग्यशास्त्र, स्वच्छता, औषधशास्त्र, शरीरशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, आणि मराठी व्याकरण इत्यादी वैज्ञानिक स्वरूपाच्या शास्त्राशी निगडित असाव्यात. या तीन ओव्यांवर खालील निकषानुसार प्रत्येक ओवीचे विश्लेषण करून ते स्वहस्ताक्षरात, किंवा टंकलेखन करून आयोजकांकडे विहीत मुदतीत पाठवायचे आहे.

५. निकष :- वैज्ञानिक ओव्यांचे विश्लेषण पुढील मुददयावर करणे बंधनकारक आहे.

अ. (१) अध्याय क्रमांक, (२) श्लोक क्रमांक, (३) ओवी क्रमांक, आणि (४) ओवी लिहीणे आवश्यक आहे. अध्याय क्रमांक, श्लोक क्रमांक, ओवी क्रमांक आणि ओवी लिहीतांना लिहीतांना (५) शुध्दलेखन असणे बंधनकारक आहे. ( प्रत्येक मुदयास २ गुण असे एकुण १० गुण)

ब. अन्वयार्थ :- प्रत्येक ओवीचा अन्वयार्थ लिहावा, म्हणजे शब्दश: अर्थ लिहावा. (१० गुण)

क. प्रत्येक ओवीमध्ये कोणते विज्ञान सांगीतलेले आहे त्याचे अचुक व संपूर्ण विश्लेषण लिहीणे आवश्यक आहे. तसेच ओवीमध्ये सांगीतलेले विज्ञान आधुनिक विज्ञानाशी कसे निगडित आहे त्याबाबत अचुक, संपूर्ण माहितीसह, पुराव्याच्या संदर्भासह विश्लेषण करणे आवश्यक आहे. मोघम स्वरूपाचे विश्लेषण असु नये. (४० गुण)

ड निवडलेल्या प्रत्येक ओवीमध्ये संत ज्ञानेश्वरांनी सांगीतलेला वैज्ञानिक दृष्टांत कोणता आध्यात्मिक सिंध्दात पटवून देण्यासाठी सांगीतला आहे यांचे अचुक व आवश्यक शब्दांमध्ये विश्लेषण करणे आवश्यक आहे. (२० गुण)

इ. ज्ञानेश्वरीतील **"पसायदान"** या विषयावर निबंध, (२० गुण)

६. स्पर्धेकाने ओवी विश्लेषण पांढ-या को-या कागदावर योग्य तो समास सोडुन करावे. सुरूवातीला स्वत:चे संपूर्ण नांव, वय, धंदा/व्यवसाय, पुर्ण पत्ता, मोबाईल नंबर, {शक्यतो व्हाटसॲप नंबर दयावा}, उपलब्ध असेल तर ईमेल आय.डी. नमुद करावा.

७. स्पर्धेकाने स्वत:चे ओवी विश्लेषण वरील निकषानुसार स्वहस्ताक्षरात किंवा टंकलेखन करून पोष्टाने बंद लिफाफा मध्ये खालील पत्यावर विहीत मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावे. पोष्टाने पाठविण्याचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे. पत्ता – ॲड बाळासाहेब बोडखे, ओवी ज्ञानेशाची स्पर्धा परिक्षा कार्यालय, विठ्ठल रूख्मीणी मंदीरा शेजारी, खिळद ता. आष्टी जि. बीड ज्यांना पोष्टाने किंवा समक्ष देणे शक्य नाही त्यांनी मोबाईल नंबर ९४२३४७१३१२ किंवा ईमेल आयडी bodkhebs@gmail.com वर स्कॅन करून पीडीएफ (pdf) स्वरूपात ऑनलाईन पाठवावे. स्कॅन करतांना Scaner App चा वापर करून Scan करून पिडीएफ करून पाठवावे.

८. स्पर्धेकाने ओवी विश्लेषण दिनांक २४ ऑक्टोबर २०२३ पासुन ते दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी पर्यंत किंवा तत्पुर्वी वरीलप्रमाणे पाठवावेत. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त ओवी विश्लेषणाचा स्पर्धेत सहभाग ग्राहय धरला जाणार नाही.

९. स्पर्धेबाबतचे सर्व अधिकार आयोजकांना राहतील. आयोजकांचा निर्णय अंतिम राहील.

१०. स्पर्धेचा निकाल जाहीर करणे व बक्षिस वाटप वेळ व ठिकाण यथावकाश कळविण्यात येईल.

११. ओवी ज्ञानेशाची या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक येणारास रू.५००१/- रोख रक्कम, दुसरा क्रमांक येणारास रू.३००१/- रोख रक्कम, आणि तिसरा क्रमांक येणारास रू.२००१/- रोख रकमेचे बक्षिस, प्रशस्तिपत्र, ज्ञानेश्वरी ग्रंथ, शाल, श्रीफळ देवून संत, महंतांच्या, जेष्ठांच्या हस्ते गौरविण्यात येईल. काही उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येतील.

स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह-आयोजक श्री. देविदास महाराज ९४२०५७९६६०, पांडुरंग गर्जे साहेब ९९२२२२९६९५, ह.भ.प. महंत आजीनाथ शास्त्री ७३५००८१०७२, पांडुतात्या गर्जे ९६२३२८४२५०, शहादेव गर्जे ९५५२०९५८५३, किरण गर्जे ९६०४६०७३०७, सरपंच डॉ. श्रीराम गर्जे ९७६३०१९५५५, भाउसाहेब गर्जे ९५५२६७८८०५, रामा गर्जे ९९२१३४२२७४, बाळासाहेब गर्जे {चेअरमन} ९९६०१८३४३३, नवनाथ साळुंके ८७६६७०४२४४, अशोक गर्जे हॉटेलवाले ९०११९०७१८१, वेदशास्त्री श्री. आडकर देवा पाटणकर ९०११९०१३५०, श्री. नंदु सर ९६०४५३४९८६, [गावाकडचा विषय या मालिकेचे लेखक, कलाकार] आणि ॲड नितीन बोडखे ८६००६७०६११ यांच्याशी संपर्क करावा. तरी आपण सर्वांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे. ही नम्र विनंती.

**आयोजक**

# ओवी ज्ञानेशाची मंडळ

**ॲड बाळासाहेब बोडखे,**

(मो. नं. ९४२३४७१३१२)